बीड |जालना| छत्रपती संभाजीनगर | पुणे | अहमदनगर,सोलापूर,नागपूर,यवतमाळ → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → गुरुवार दि.२८ मे २०२६ → वर्ष १० वे → अंक -११ → पाने ४ → किंमत २ रु
Beed /Jalna/ Chatrapati Sambhajinagar / pune / Ahamadnagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Thusday Date: 28 May 2026 → 10 th Year → 04 Paper → Pages : 4 → Price - 2 Rupees

महाराष्ट्राचा महानायक
# लोकनायक
संपादक - भारत गायकवाड

# शेतकऱ्यांना प्राधान्याने आणि रुग्णवाहिकांना विनाविलंब इंधन पुरवठा करा- आ.संदीप क्षीरसागर

## पेट्रोल डिझेलचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे आ.क्षीरसागरांची मागणी

**जिल्ह्यात निर्माण झालेल्या इंधन टंचाईच्या गंभीर परिस्थितीमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी तसेच अत्यावश्यक सेवा मोठ्या अडचणीत सापडल्या असून, या पार्श्वभूमीवर आ. संदीप क्षीरसागर यांनी आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतसविस्तर निवेदन दिले. इंधनाचा सुरळीत पुरवठा, पेट्रोल पंपांवरील काळाबाजार रोखणे, शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक डिझेल उपलब्ध करून देण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.**



**लोकनायक वृत्तसेवा –**
सध्या जिल्ह्यात अनेक पेट्रोल पंपांवर पेट्रोल व डिझेलचा तुटवडा जाणवत असून नागरिकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. काही ठिकाणी इंधन साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर आ.क्षीरसागर यांनी प्रशासनाने कठोर पावले उचलून नागरिकांना नियमित व सुरळीत इंधन पुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी केली. विशेषतः शेतकरी वर्ग सध्या शेतीच्या महत्त्वाच्या कामांमध्ये व्यस्त असून, ट्रॅक्टर, पंप व शेतीच्या यंत्रांसाठी डिझेल उपलब्ध न झाल्यास दुबार पेरणीचे संकट निर्माण होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांना प्राधान्याने इंधन उपलब्ध करून देण्याचे निर्देश संबंधित विभागांना द्यावेत, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना वेळेत इंधन मिळाले नाही तर शेतीची मोठी हानी होऊ शकते. प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे, असे आ.क्षीरसागर यांनी म्हटले आहे. यावेळी पेट्रोल पंप चालकांकडून होत असलेल्या काळाबाजाराचाही मुद्दा त्यांनी ठळकपणे मांडला. काही ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने इंधन विक्री केली जात असल्याच्या तक्रारी वाढत असून, अशा प्रकारांना तात्काळ आळा घालावा व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. संकटाच्या काळात जनतेची अडवणूक करणाऱ्यांना प्रशासनाने कोणतीही सवलत देऊ नये, असेही त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच रुग्णवाहिकांना विनाविलंब पेट्रोल डिझेल उपलब्ध करून देण्याबाबत आ.क्षीरसागर यांनी विशेष लक्ष वेधले. आपत्कालीन वैद्यकीय सेवेसाठी धावणाऱ्या रुग्णवाहिकांना अनेक ठिकाणी इंधनासाठी अडचणी निर्माण होत असल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे कोणतीही अडवणूक न करता रुग्णवाहिकांना तातडीने इंधन उपलब्ध करून देण्याची व्यवस्था प्रशासनाने करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# भारतीय शेतीच्या नव्या पर्वाची चाहूल; गांधी, गोयल, अग्रवाल यांची महत्त्वपूर्ण बैठक

## मकृषी, बँकिंग आणि वित्तीय क्षेत्र बळीराजाच्या उन्नतीसाठी एकत्रम

**लोकनायक वृत्तसेवा –**
भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी आजही अनेक आव्हानांशी झुंज देत आहे. उत्पादन वाढत असले तरी उत्पन्नाची हमी नाही, बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याची मर्यादा आहे आणि शेतीकडे अजूनही अनेकदा केवळ उदरनिर्वाहाचे साधन म्हणूनच पाहिले जाते. मात्र आता या पारंपरिक चौकटी मोडून भारतीय शेतीला नव्या आर्थिक क्रांतीच्या केंद्रस्थानी आणण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत. याच पार्श्वभूमीवर ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी, भारतीय स्टेट बँकेचे (डइख) कृषी विभागाचे मुख्य महाव्यवस्थापक गोविंद नारायण गोयल आणि मोतीलाल ओसवाल समूहाचे अध्यक्ष रामदेव अग्रवाल यांच्यात एक अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकीचा केंद्रबिंदू होता 'भारतीय शेतकऱ्याला राष्ट्रउभारणीच्या केंद्रस्थानी आणणे'. गांधी, गोयल, अग्रवाल यांच्यात झालेली ही बैठक केवळ **पान २ वर**

# ईद-उल-अजहा

## नमाज टाईम टेबल

| | |
|---|---|
| बालेपीर ईदगाह | ७.३० |
| पुरानी ईदगाह | ८.०० |
| मरकज मस्जिद | ७.०० |
| तकिया मस्जिद | ७.१५ |
| जामा मस्जिद किल्ला | ७.४५ |
| नमरा मस्जिद | ६.२५ |
| केजीएन | ८.४५ |
| शहेंशाहवली दर्गा | ७.३० |
| हजरत बालेपीर दर्गा | ८.३० |
| ईज्तेमा मैदान मोमीनपुरा | ७.३० |
| अलिया मस्जिद झमझम कॉलनी | ६.१० |
| अक्सा मस्जिद शहेंशाहनगर | ७.०० |
| चंदा माँ मस्जिद | ७.०० |
| मदरसा दारूलुम बीड | ७.०० |
| जुलेखा मस्जिद बालेपीर | ८.०० |
| चंदाशाह मस्जिद | ८.०० |
| कारांजा मस्जिद | ७.१५ |
| बीबी फातेमा मस्जिद | ८.३० |
| बाबु शाह मस्जिद | ७.३० |
| बारादरी मस्जिद | ७.३० |
| खादर पाशा मस्जिद | ८.०० |

# सेवानिवृत्तीचे लाभ न मिळू देण्यासाठी केलेल्या कारवाईची उच्चस्तरीय चौकशी करा

**लोकनायक वृत्तसेवा–**
माजलगाव– कृषी विकास अधिकारी जि.प.बीड व अपर आयुक्त आस्थापना यांनी नियमबाह्य व शासन निर्णयाचे उल्लंघन करून सेवानिवृत्तीचे लाभ न मिळू देण्यासाठी केलेल्या कारवाईची उच्चस्तरीय चौकशी करावी व गुन्हे दाखल करून न्याय द्यावा अशी मागणी राज्याचे मुख्य सचिव यांच्या कडे माजलगाव शहरातील सेवानिवृत्त कृषी विकास अधिकारी प्रभाकर खोले यांनी २५मे –२०२६रोजी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्हा प्रशासन व अपर आयुक्त आस्थापना यांच्या नियमबाह्य व शासन निर्णया विरूध्द जावुन माझ्यावर कटकारस्तान रचून पदोन्नतीपा–सून वंचित ठेवण्यासाठी व सेवानिवृत्तीचा लाभ न मिळू देण्यासाठी खोट्या कारवाई करण्यात आल्या.

या जाचक कारवाईमुळे माझी आर्थिक,शारीरिक , मानसिक नुकसान झाले व सेवानिवृत्तीचे लाभांषापासून वंचित ठेवण्यात आले. नियमबाह्य व शासन निर्णयाचे उल्लंघन करून कारवाया कशा केल्या याची उच्चस्तरीय चौकशी करून खुलासा करण्यात यावा. यासह विवीध मागण्यांचे निवेदन राज्याचे मुख्य सचिव यांना देण्यात आले असुन निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून पुराव्या आधारे चौकशी करून केलेला अन्याय दूर करावा व न्याय द्या अन्यथा मरण्याची परवानगी द्या अशी मागणी देखील करण्यात आली आहे.

# जीवे मारण्याची धमकी देत युवतीवर अत्याचार

**लोकनायक वृत्तसेवा –**
बस स्थानक परिसरात असलेल्या एका लॉजवर २० वर्षीय युवतीला जीवे मारण्याची धमकी देत अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली. यावेळी आरोपीने आक्षेपार्ह चित्रीकरण मोबाईल मध्ये रेकॉर्ड करत पीडित युवतीला फोन करून ब्लॅक मेल करत असल्याने पीडित युवतीने अखेरीस कंटाळून पोलीस ठाणे गाठत गुन्हा दाखल केला. पोलीस सूत्राकडून प्राप्त माहितीनुसार परळी येथील बसस्टँड समोरील खाजगी लॉज मध्ये उखळी ता सोनपेठ येथील २८ वर्षीय तरुणाने शुक्रवार दि २२ रोजी परभणी येथील युवतीला बोलावून घेतले. यावेळी युवतीला धमकावत अत्याचार केला. यावेळी आरोपीने सदरील पीडित युवतीचे आक्षेपार्ह चित्रीकरण मोबाईल मध्ये रेकॉर्ड करत काढलेले अश्लील फोटो व्हायरल करतो म्हणुन फोनदवारे व्हॉटसअप वर मेसेजेस करुन आणि कॉल करुन सतत ब्लॅकमेल करत होता.सततची धमकी आणि त्रासाला कंटाळून पीडित युवतीने परभणी येथे पोलीस ठाणे गाठत आपबीती कथन केली असता गुन्हा हा परळीतील संभाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत घडल्याने सदरील पीडितेच्या तक्रारीवरून गुरंन. १३१/२०२६ कलम ६४(१), ६४(२)(I), ३५१(२) इछड सह कलम ३(२) (५),३(१) (ी) (ड) अनुसुचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम कायदा १९८९ अनव्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास उप विभागीय पोलीस **पान २ वर**

# माजलगावातील सावरगाव येथे धरणात बुडून परतुर तालुक्यातील १७वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू

**लोकनायक वृत्तसेवा.**माजलगाव – तालुक्यातील सावरगाव शिवारातील धरणात बुडून परतुर तालुक्यातील शेतमजूर आई वडिलांच्या १७वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना २७ मे बुधवार रोजी दुपारी २:३०वाजण्याच्या सुमारास घडली.मिळालेल्या माहितीनुसार, मृत मुलाचे नाव आदित्य उत्तमराव रंजवे (१७वर्षे ) असे असून तो मूळचा मुपो.धामणगाव सावटगाव, ता.परतूर, जि.जालना येथील रहिवासी होता.



आदित्यचे वडील काही दिवसांपूर्वी माजलगाव तालुक्यातील सावरगाव शिवारातील शेतात सालगडी म्हणून काम करण्यासाठी कुटुंबासह आले होते. आदित्य हा कुटुंबातील मोठा मुलगा होता. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार आदित्य हा आपल्या लहान भावासह व काही मित्रांसोबत सावरगाव शिवारातील ङ्गतळातङ्घ नावाने ओळखल्या जाणाऱ्या धरणात पोहण्यासाठी गेला होता. धरणामध्ये गाळ उपसा करण्यात आलेल्या ठिकाणी मोठमोठे खड्डे निर्माण झाले होते त्या खोल पाण्याचा अंदाज न आल्याने आदित्य अचानक पाण्यात बुडाला.दरम्यान पाण्याची मोटार सुरू करण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांच्या ही बाब निदर्शनास येताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत शोधकार्य सुरू केले. काही वेळाच्या प्रयत्नानंतर आदित्यला पाण्याबाहेर काढण्यात आले मात्रतोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता.या दुर्दैवी घटनेमुळे सावरगाव परिसरात शोककळा पसरुन नागरिकांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.









लोकनायक

गुरुवार दि.२८ मे २०२६



# ह.पिंप्री महसूल मंडळात तुफान वारा,विजा, पाऊस यामुळे शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान!

## नाव्होली शिवारातील अनेक शेतकऱ्यांचे सोलार पॅनल वादळाच्या तडाख्यात होत्याचे नव्हते!

**लोकनायक वृत्तसेवा –**
सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. जमिनीतील पाणी पातळी घटली असुन शेतातील पिकांना पाणी देण्याचे सोडा परंतु पिण्याच्या पाण्यासाठी देखील लोकांना भटकंती करावी लागत आहे. निसर्गाने आपले सर्व चित्रच बदलून टाकले आहे. त्यामुळे उन्हाळ्यात पावसाळा आणि पावसाळ्यात उन्हाळा असे चित्र तयार झाले आहे. गेल्या महिनाभरापासून तर तिव्र उन आणि त्यात अधुनमधून येणारा अवकाळी पाऊस सोसाट्याचा वारा यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. तशाच प्रकारची घटना काल हनुमंत पिंपरी महसूल मंडळात घडली असुन काल दि. २५ मे सोमवार रोजी रात्री झालेल्या तुफानी चक्री वादळाने कहर केला असुन नाव्होली येथील शेतकऱ्यांच्या शेतात कुठे झाड राहिले नाही. तर शेतात बसवलेले सोलार पॅनल होत्याचे नव्हते झाल्याने या शेतकऱ्यांपुढे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की केज तालुक्यातील हनुमंत पिंपरी महसुली मंडळात नाव्होली शिवारातील नाव्होली येथील शेतकरी धनंजय धर्मराज बिक्कड यांच्या सर्व्हे नं ८९ मध्ये बसवण्यात आलेले ईल्केट्रा कंपनीचे सोलार वादळी वाऱ्यात मोडुन तुटून गेले असुन त्यांच्या बरोबर सर्व्हे नं ३१० मधील शेतकरी धर्मराज गौदास बिक्कड यांचे जी के सोलार एनर्जी या कंपनीचे सोलार पॅनल तुटून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे.तसेच नाव्होली येथिलच श्रीराम शिवाजी बिक्कड यांचे खाते क्र.९२४ सर्व्हे नं/गट नं १८५ मधील प्रोटोमैक्स कंपनीचे सोलार पॅनल तुटून गेल्याने मोठी हानी झाली आहे.

या वरील ठिकाणचे शेतकरी आपल्या पशुधनाला व पिण्याच्या पाण्यासाठी या सोलार टॉवरचा वापर करत होते. मात्र ज्या कंपनीने हे सोलार पॅनल बसलेले होते. ते या वादळात तग धरू शकले नाहीत.व ही मोठी दुर्घटना घडली आहे.सझरील घटना काल दि. २५ मे सोमवार रोजी रात्री अचानक एक मोठे अस्मानी संकट आले त्यामध्ये कडकडणाऱ्या विजा, तुफान वादळ गारांचा पाऊस त्यामुळे यामध्ये मोठमोठी झाडे, शेतातील शेड जनावरांचे गोठे, कागदाप्रमाणे उडून गेले.तसेच या तुफानी वादळाने अनेक झाडे ,मोडून पडली आहेत. त्याच बरोबर ३३ के.व्ही लाईटचे विद्युत खांब मोडून जमिनीवर पडल्याने तारा तुटून अशी मागणी वरील शेतकऱ्यांनी कंपनीकडे केली आहे.

त्यामुळे या चक्री वादळाने नुकसान झालेल्या सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत करण्यात अशी मागणी शेतकऱ्यांनी निर्माण झाला आहे. त्यामुळे सदरील उल्लेख केलेल्या कंपनीने तात्काळ दखल घेवुन शेयकऱ्यांना असे नाव्होली येथील शेतकरी यांनी आमच्या प्रतिनीधीशी बोलताना सांगितले आहे.



विद्युत पुरवठा दोन दिवस खंडित झाला होता.
त्यामुळे धनंजय धर्मराज बिक्कड, धर्मराज गौदास बिक्कड आणि श्रीराम शिवाजी बिक्कड या शेतकऱ्यांनी बसवलेल्या वरील कंपनीचे सोलार पॅनल सदरील कंपनीने तात्काळ दुरुस्त करून द्यावेत कंपनीकडे केली आहे.
तर पावसाळ्यातील येणारे तुफान वाऱ्यापुढे असे सोलार पॅनल तग धरतील काय? असा प्रश्न शेतकरी वर्गातून विचारला जात आहे. या वादळात मात्र सोलार पॅनल तुटून गेल्याने या शेतकऱ्यांपुढे पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न

सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. जमिनीतील पाणी पातळी घटली असुन शेतातील पिकांना पाणी देण्याचे सोडा परंतु पिण्याच्या पाण्यासाठी देखील लोकांना भटकंती करावी लागत आहे. निसर्गाने आपले सर्व चित्रच बदलून टाकले आहे. त्यामुळे उन्हाळ्यात पावसाळा आणि पावसाळ्यात उन्हाळा असे चित्र तयार झाले आहे. गेल्या महिनाभरापासून तर तिव्र उन आणि त्यात अधुनमधून येणारा अवकाळी पाऊस सोसाट्याचा वारा यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. तशाच प्रकारची घटना काल हनुमंत पिंपरी महसूल मंडळात घडली असुन काल दि. २५ मे सोमवार रोजी रात्री झालेल्या तुफानी चक्री वादळाने कहर केला असुन नाव्होली येथील शेतकऱ्यांच्या शेतात कुठे झाड राहिले नाही. तर शेतात बसवलेले सोलार पॅनल होत्याचे नव्हते झाल्याने या शेतकऱ्यांपुढे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की केज तालुक्यातील हनुमंत पिंपरी महसुली मंडळात नाव्होली शिवारातील नाव्होली येथील शेतकरी धनंजय धर्मराज बिक्कड यांच्या सर्व्हे नं ८९ मध्ये बसवण्यात आलेले ईल्केट्रा कंपनीचे सोलार वादळी वाऱ्यात मोडुन तुटून गेले असुन त्यांच्या बरोबर सर्व्हे नं ३१० मधील शेतकरी धर्मराज गौदास बिक्कड यांचे जी के सोलार एनर्जी या कंपनीचे सोलार पॅनल तुटून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे.तसेच नाव्होली येथिलच श्रीराम शिवाजी बिक्कड यांचे खाते क्र.९२४ सर्व्हे नं/गट नं १८५ मधील प्रोटोमैक्स कंपनीचे सोलार पॅनल तुटून गेल्याने मोठी हानी झाली आहे.

या वरील ठिकाणचे शेतकरी आपल्या पशुधनाला व पिण्याच्या पाण्यासाठी या सोलार टॉवरचा वापर करत होते. मात्र ज्या कंपनीने हे सोलार पॅनल बसलेले होते. ते या वादळात तग धरू शकले नाहीत.व ही मोठी दुर्घटना घडली आहे.सझरील घटना काल दि. २५ मे सोमवार रोजी रात्री अचानक एक मोठे अस्मानी संकट आले त्यामध्ये कडकडणाऱ्या विजा, तुफान वादळ गारांचा पाऊस त्यामुळे यामध्ये मोठमोठी झाडे, शेतातील शेड जनावरांचे गोठे, कागदाप्रमाणे उडून गेले.तसेच या तुफानी वादळाने अनेक झाडे ,मोडून पडली आहेत. त्याच बरोब र ३३ के.व्ही लाईटचे विद्युत खांब मोडून जमिनीवर पडल्याने तारा तुटून विद्युत पुरवठा दोन दिवस खंडित झाला होता.
त्यामुळे धनंजय धर्मराज बिक्कड, धर्मराज गौदास बिक्कड आणि श्रीराम शिवाजी बिक्कड या शेतकऱ्यांनी बसवलेल्या वरील कंपनीचे सोलार पॅनल सदरील कंपनीने तात्काळ दुरुस्त करून द्यावेत अशी मागणी वरील शेतकऱ्यांनी कंपनीकडे केली आहे.

त्यामुळे या चक्री वादळाने नुकसान झालेल्या सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत करण्यात अशी मागणी शेतकऱ्यांनी कंपनीकडे केली आहे.
तर पावसाळ्यातील येणारे तुफान वाऱ्यापुढे असे सोलार पॅनल तग धरतील काय? असा प्रश्न शेतकरी वर्गातून विचारला जात आहे . या वादळात मात्र सोलार पॅनल तुटून गेल्याने या शेतकऱ्यांपुढे पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

त्यामुळे सदरील उल्लेख केलेल्या कंपनीने तात्काळ दखल घेवुन शेयकऱ्यांना असे नाव्होली येथील शेतकरी यांनी आमच्या प्रतिनीधीशी बोलताना सांगितले आहे.

---

## पान १ वरून

**भारतीय शेतीच्या नव्या पर्वाची चाहूल; गांधी, ..**
औपचारिक चर्चा नव्हती, तर भारताच्या ग्रामीण आणि कृषी अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देण्याच्या व्यापक दृष्टिकोनाची सुरुवात मानली जात आहे. या बैठकीनंतर ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी म्हणाले की, तळागाळातील प्रत्यक्ष सामाजिक कार्य, संस्थात्मक बँकिंगची ताकद आणि देशातील वित्तीय बाजारपेठेचा अनुभव यांची सांगड घालत भारतीय शेतीला नव्या युगात नेण्याचा निर्धार या बैठकीतून व्यक्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमामागे ङ्गशेती म्हणजे फक्त उत्पादन नव्हे, तर राष्ट्र निर्मितीचे शक्तिशाली माध्यमङ्ख ही भूमिका स्पष्टपणे अधोरेखित करण्यात आली. आधुनिक वित्तीय नियोजन, बाजारपेठेतील गुंतवणूक, शाश्वत शेती पद्धती, मूल्यवर्धन आणि ग्रामीण उद्योजकता यांचा समन्वय साधून शेतकऱ्यांचे उत्पन्न अनेक पटींनी वाढविण्याचा रोडमॅप तयार करण्यावर भर देण्यात आला असल्याचेही त्यांनी सांगितले.

आज भारताला सर्वाधिक गरज आहे ती ग्रामीण भाग आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याची. कारण खऱ्या अर्थाने विकसित भारताचा मार्ग हा गावातून आणि शेतातूनच जातो. देशातील लाखो शेतकरी आत्मनिर्भर आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले, तर भारताचे आर्थिक सार्वभौमत्व अधिक बळकट होईल, असा विश्वास या बैठकीत व्यक्त करण्यात आला. देश बदलण्याची मोठी स्वप्ने अनेकांनी पाहिली; परंतु ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी जल, जमीन, जन आणि अर्थव्यवस्था यांना एकाच ध्येयाने जोडण्याची आवश्यकता असते. हीच दिशा या महत्त्वपूर्ण बैठकीतून स्पष्टपणे पुढे आल्याचे बोलले जात आहे.

**जीवे मारण्याची धमकी ..**
अधिकारी ऋषिकेश शिंदे हे करत असून त्यांनी बुधवार दि २७ रोजी घटनास्थळी भेट दिली.**भारतीय शेतीच्या नव्या पर्वाची चाहूल; गांधी, ..**
औपचारिक चर्चा नव्हती, तर भारताच्या ग्रामीण आणि कृषी अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देण्याच्या व्यापक दृष्टिकोनाची सुरुवात मानली जात आहे. या बैठकीनंतर ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी म्हणाले की, तळागाळातील प्रत्यक्ष सामाजिक कार्य, संस्थात्मक बँकिंगची ताकद आणि देशातील वित्तीय बाजारपेठेचा अनुभव यांची सांगड घालत भारतीय शेतीला नव्या युगात नेण्याचा निर्धार या बैठकीतून व्यक्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमामागे ङ्गशेती म्हणजे फक्त उत्पादन नव्हे, तर राष्ट्र निर्मितीचे शक्तिशाली माध्यमङ्ख ही भूमिका स्पष्टपणे अधोरेखित करण्यात आली. आधुनिक वित्तीय नियोजन, बाजारपेठेतील गुंतवणूक, शाश्वत शेती पद्धती, मूल्यवर्धन आणि ग्रामीण उद्योजकता यांचा समन्वय साधून शेतकऱ्यांचे उत्पन्न अनेक पटींनी वाढविण्याचा रोडमॅप तयार करण्यावर भर देण्यात आला असल्याचेही त्यांनी सांगितले.

आज भारताला सर्वाधिक गरज आहे ती ग्रामीण भाग आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याची. कारण खऱ्या अर्थाने विकसित भारताचा मार्ग हा गावातून आणि शेतातूनच जातो. देशातील लाखो शेतकरी आत्मनिर्भर आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले, तर भारताचे आर्थिक सार्वभौमत्व अधिक बळकट होईल, असा विश्वास या बैठकीत व्यक्त करण्यात आला. देश बदलण्याची मोठी स्वप्ने अनेकांनी पाहिली; परंतु ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी जल, जमीन, जन आणि अर्थव्यवस्था यांना एकाच ध्येयाने जोडण्याची आवश्यकता असते. हीच दिशा या महत्त्वपूर्ण बैठकीतून स्पष्टपणे पुढे आल्याचे बोलले जात आहे.

---

## पान ४ वरून

**आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला मोठे यश..**
सचिन खिळे, भाऊसाहेब खिळे, कैलास काळभोर, रघुनाथ खिळे यांच्यासह कानडी, बेलगाव व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनी यावेळी आनंद व्यक्त करत या कामामुळे भविष्यात मोठा दिलासा मिळणार असल्याची भावना व्यक्त केली.
सदर काम पूर्ण झाल्यानंतर भविष्यातील पुराचा धोका कमी होण्यास मोठी मदत होणार असून बंधाऱ्यालगतच्या शेतीचे संरक्षण होणार आहे. तसेच वाहून गेलेली जमीन पुन्हा उपयोगात येण्यास मदत होणार असल्याने शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. अनेक दिवसांपासून रखडलेल्या या प्रश्नाला अखेर मार्ग लागल्याने ग्रामस्थांनी लोकनेते आ. सुरेश धस तसेच नाम फाउंडेशनचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.
ङ्गगावाच्या विकासासाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी लोकप्रतिनिधींनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा किती महत्त्वाचा असतो, याचे हे उत्तम उदाहरण आहे,ङ्ख अशा भावना यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

**ओंकार शुगर्सने फिरवली पाठ; ऊस ..**
शेतकऱ्यांना घोषित दरानुसार देयक अदा करण्याबाबत चालढकल होत असल्याने परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी बुधवार दि २७ रोजी कारखान्यासमोर घोषणाबाजी करत आपल्या मागण्याचे निवेदन कारखाना प्रशासनाला देत या महिण्याखेर जाहीर केलेल्या दरानुसार ऊस देयक अदा न केल्यास दि १ जून पासून बेमुदत सत्याग्रह आंदोलन करण्याचा इशारा दिला. परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसोबत संघर्ष समितीचे ॲड. अजय बुरांडे, ॲड.श्रीनिवास मुंडे, कॉ.मुरलीधर नागरगोजे, हनुमंत सोळंके कॉ.भगवान बडे, रघुनाथ दादा देशमुख हनुमंत लोंढे, कृष्णा कराड , धोंडीबा दिवटे, अशोक शिंदे, दत्तात्रय तिडके, प्रभाकर मुंडे, मनोहर मुंडे, बिभीषण गित्ते,अविनाश मुंडे, शरद गित्ते सूर्यकांत तिडके यांच्या सह अनेक शेतकरी आंदोलक उप-स्थित होते.
जिल्ह्यात ऊस गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी ३०५० रु सर्वात जास्त ओंकार शुगर्सने दर जाहीर करत पहिला हप्ता २९५० रु व दीपावली सणासाठी १०० रुपये प्रमाणे २९५० प्रमाणे सुरुव-ातीच्या काळातील काही शेतकऱ्यांचे ऊस बिल अदा केली. नियमानुसार गाळपानंतर पंधरा दिवसात बिल देणे अपेक्षित असताना तीन-चार महिने विलंब केल्याने दि ९ मे रोजी शेतकऱ्यांनी सत्याग्रह आंदोलन पश्चात केवळ १८०० रुपये प्रति टनाप्रमाणे देयक अदा केले. गेले उर्वरित ११५० रुपये हे दि २५ मे पर्यंत संपूर्ण गाळप झालेल्या शेतकऱ्यांना २९५० प्रमाणे पैसे देण्याचं लेखी कबूल केलं. असे असताना सुद्धा अद्याप १८०० रुपये सुद्धा संपूर्ण शेतकऱ्यांना दिले गेले नाहीत.सर्व बाबतीत ओंकार शुगर कडून शेतकऱ्यांची वारंवार दिशाभूल केली जात आहे. नियमानुसार ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळेवर देयके अदा करावीत असे स्पस्ट आदेश अ
सताना नियमाला हडताल पुसणाऱ्या राज्यातील ५४ साखर कारखान्यावर साखर आयुक्तांनी सुना-वणी घेत कारवाई केली असताना जिल्ह्यातील साखर कारखान्याबाबत राज्यसरकार साखर आयुक्त, जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधी मूक गिळून गप्प का असा प्रश्न शेतकऱ्यांना निर्माण झाला आहे.जाहीर केलेल्या दरानुसार ऊस देयक मिळावीत अशी ठाम भूमिका संघर्ष समितीने घेतली आहे.

*ऑड.अजय बुरांडे*
संघर्ष समिती, बीड

**सौर ऊर्जा योजनेत बीड राज्यात ..**
असल्यामुळे बीड जिल्ह्यासाठी विशेष निधी आणि मंजुरी मिळवून घेण्यासाठी त्यांनी शासनावर दवाब गट निर्माण केला. त्यांच्या या अथांग प्रयत्नामुळेच बीड जिल्हा ला योजनेत अग्रस्थान मिळवून देण्यात यश आले. या ऐतिहासिक यशाच्या पार्श्वभूमीवर गेवराई तालुक्यात सौर ऊर्जा योजनेचे श्याम मोरे यांनी एक विशेष पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोल-ताना मोरे यांनी अत्यंत आनंद व्यक्त केला आणि 'आमच्या सामूहिक प्रयत्नांना अखेर मोठे यश आले आहे ' असे संबोधित केले गेवराई तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातून ५५६१८ अर्ज प्राप्त झाले आहेत. हा आकडा इतर जिल्ह्याच्या तु-लनेतून सर्वाधिक आहे. एवढ्या मोठ्या संख्येने अर्ज येणे हे जिल्ह्यात झालेल्या जनजागृतीचे आणि लोकांच्या बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र पदाधिकारी विश्वासाचे प्रतिक आहे. असे त्यांनी नमूद केले. बीड जिल्हा ने सौर ऊर्जा सारख्या पर्यावरण पूरक आणि शाश्वत विकास योजनेत मिळवलेल्या या प्रथम क्रमांका मुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या कामगिरी बद्दल अनिल बोर्डे, श्याम मोरे, प्रा. भानुदास फलके ग्राहक पंचायत चे सर्व पदाधिकारी, यांचे सर्व स्तरावरून भरभरून कौतुक होत आहे. या योजनेमुळे जिल्ह्यातील हजारो शेतकरी ग्राहकांना उन्हाळ्यात हक्काची आणि दिवसा वीज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याप्रकरणी जिल्ह्यातील सर्व मा.संपादक व प्रतिनिधी यांनी वेळोवेळी बातमी प्रसिद्ध करून ग्राहक पंचायत कार्यात मोलाचे सहकार्य केले आहे. या यशात त्यांचा देखील सहभाग आहे.

**आष्टी चित्रदर्शनचे उपसंपादक यशवंत ..**
माता रमाई यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, वंचितांच्या हक्कासाठी लढणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनात माता रमाई यांचा त्याग, प्रेरणा आणि खंबीर साथ मोलाची होती. बाबासाहेब परदेशात उच्च शिक्षण घेत असताना अत्यंत कठीण परिस्थितीत त्यांनी संसाराची जबाबदारी सांभाळली. त्यांच्या त्यागामुळेच बाबासाहेबांना समाजउद्धार व भारतीय संविधान निर्मितीचे महान कार्य करता आले, असे त्यांनी नमूद केले. तसेच बाबासाहेबांनी ङ्गथॉट्स ऑन पाकिस्तानङ्ख हा ग्रंथही माता रमाईना समर्पित केल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी बाळासाहेब मुळे व रमेश गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन डॉ. गणेश ढवळे यांनी केले.

लोकनायक
गुरुवार दि.२८ मे २०२६


# आटपाडीचे ज्येष्ठ पत्रकार चैतन्य पैठणकर यांचे निधन

## सादिक खाटीक यांनी वाहिली भावपूर्ण श्रद्धांजली

**लोकनायक वृत्तसेवा –** दैनिक सकाळ, दैनिक लोकसत्ताचे माजी बातमीदार, २५ वर्षे पत्रकारीतेत खास ठसा उमटविणारे शांत, संयमी, निगर्वी, कष्टाळू व्यक्तीमत्व चैतन्य यशवंत पैठणकर ( वय ६४ ) यांचे पुणे येथे दुःखद निधन झाले . गेले काही दिवस त्यांचेवर उपचार सुरू होते . आज रात्री ८ वाजणेच्या दरम्यान चैतन्य पैठणकर यांची प्राणज्योत मालवली .

१९८५ च्या दरम्यान सकाळ कोल्हापूर मधून बातमीदारीस सुरुवात केलेल्या चैतन्य पैठणकर यांनी सलग २५ वर्षे पत्रकारीतेत मोलाची कामगिरी बजावली . आटपाडी तालुक्याच्या चौफेर व सर्वांगीण परिवर्तनात शेकडो प्रश्नांवर निस्वार्थ भावनेने खारीचे योगदान देणाऱ्या चैतन्य पैठणकर यांच्या पत्रकारितेने नेहमीच आग्रही, सजग राहण्यात मोठी भूमिका बजावली होती . आटपाडी तालुक्याच्या सर्व क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वच आणि विशेषत : सांगली जिल्हा स्तरावरील अनेक नेतेमंडळी चैतन्य पैठणकर यांचा आपुलकी, श्रद्धा, आत्मीयता आणि सदभावना, सन्मानाने मोठा आदर करीत . राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वतः ला सदैव स्वयंसेवक म्हणून घेणाऱ्या चैतन्य पैठणकर यांनी सर्वच जाती, जमाती धर्मातील असंख्य लोकांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले होते .



विविध धार्मिक कार्यात पौराहित्य करण्याचे काम ही चैतन्य पैठणकर यांनी अनेक दशके केले . अत्यंत गरीबीत जीवन जगलेल्या चैतन्य पैठणकर यांनी सदैव हसतमुख स्वभाव–द्वारे आपल्या जीवनाला नवा आयाम दिला . वीस वर्षापूर्वी पत्नी, काही वर्षापूर्वी भाऊ, बहीन गमावलेल्या चैतन्य पैठणकर यांनी या प्रचंड दुःखावर मात करीत त्यांचे सुपुत्र ओंकार यांना परिपूर्ण घडविण्यात प्रचंड यातायात केली होती

मुलगा, सून, नात, बहिणी, इतर नातलग असा स्वपरिवार आणि मोठा मित्र परिवार मागे असणाऱ्या चैतन्य पैठणकर यांच्या जाण्याने आपल्याला अतिव दुःख झाल्याच्या आणि एक सच्चा, दिलदार, माणुसकी सर्वश्रेष्ठ मानणारा दोस्त, ज्येष्ठ बंधु आपण गमावल्याच्या भावना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी विभागाचे प्रदेशचे उपाध्यक्ष, तथा ज्येष्ठ पत्रकार सादिक खाटीक यांनी व्यक्त करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली . पुणे येथेच चैतन्य पैठणकर यांच्या पार्थीवावर अंत्यसंस्कार केले जाणार असल्याचे त्यांच्या नातेवाईकांनी सांगीतले .

मुलगा, सून, नात, बहिणी, इतर नातलग असा स्वपरिवार आणि मोठा मित्र परिवार मागे असणाऱ्या चैतन्य पैठणकर यांच्या जाण्याने आपल्याला अतिव दुःख झाल्याच्या आणि एक सच्चा, दिलदार, माणुसकी सर्वश्रेष्ठ मानणारा दोस्त, ज्येष्ठ बंधु आपण गमावल्याच्या भावना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी विभागाचे प्रदेशचे उपाध्यक्ष, तथा ज्येष्ठ पत्रकार सादिक खाटीक यांनी व्यक्त करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली .

पुणे येथेच चैतन्य पैठणकर यांच्या पार्थीवावर अंत्यसंस्कार केले जाणार असल्याचे त्यांच्या नातेवाईकांनी सांगीतले .

# पुसद तालुक्यातील शेबाळ पिंपरी व ईसापुर धरण परिसरात अवैध धंदे जोमात

## ठाणेदारांच्या कार्यपध्दतीवर नागरिकांचा संताप

**लोकनायक वृत्तसेवा –** खंडाळा पोलीस स्टेशन हद्दित मटका,जुगार,गावठी,देशी दारु खुलेआम विक्री यांसारख्या अवैध धंद्दाचे जाळे मोठ्या प्रमानवर पसरले आहे. नवनियुक्त ठाणेदाराच्या नियुक्ती नंतर यांच्या या छुप्या व्यवसायांना अधिकच ऊत आला असून यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. ईसापुर बसस्थानक परिसर कैनलच्या काठावरच्या बाजुला शाळा परिसर या भागांमध्ये दिवसाढवळ्या अवैध व्यावहार सुरु असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडुन करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी रात्री उशिरापर्यत जुगाराचे अड्डे

रंगत असुन गावठि दारू व देशी दारु विक्री बिनधास्तपणे सुरू आहे पूर्वी या अवैध धंद्दांवर काही प्रमाणात नियंत्रण दिसुन येत होते मात्र संध्या कारवाईचा पूर्णपणे अभाव जाणवत आहे. बिट जमादार गोपाल मोरे व पो–लीस उप निरिक्षण शिवाजी देशमुख , यांच्या आशीर्वादाशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणात हे अवैध प्रकार सुरू राहू शंकत नाहित असा गंभीर आरोप संतप्त रहिवाशांनी केला आहे. या परिस्थितीमुळे परिसरातील तरुण पिढी व्यसनाच्या आहरी जात असून, शाळा परिसरात चालणाऱ्या मटका,

जुगार, व गावठि दारू अंड्डयांमुळे पालकवर्गात भीती आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या या वाढत्या गुन्हेगारी स्वरूपाच्या प्रवृत्तीवर स्थानिक पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई केली जात नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवरच मोठे प्रश्नचिन्ह उप–स्थित होत आहे.त्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षकांनी

या प्रकरणात तात्काळ लक्ष घालून खंडाळा पोलीस स्टेशनच्या ढिसाळ कार्यपद्धतीची सखोल चौकशी करावी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यावर कायदेशीर कारवाई करावी आणि हे अवैध धंदे कायमस्वरूपी बंद करून परिसर भयमुक्त करावा अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे

# कत्तलीसाठी नेल्या जाणाऱ्या ६३ गोवंश प्राण्यांची पोलिसांनी केली सुटका; लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त

**लोकनायक वृत्तसेवा :** यवतमाळ जिल्ह्यात आगामी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर पो–लीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी अवैध गोवंश तस्करीविरोधात जोरदार मोहीम उघडली असून, अवघ्या २४ तासांत कळंब, महागाव आणि पांढरकवडा या तीन पोलीस ठाण्यांच्या हद्दीत धडाकेबाज कारवाया करत कत्तलीसाठी क्रूरपणे बांधून ठेवलेल्या एकूण ६३ गोवंश प्राण्यांची यशस्वी सुटका केली आहे.कळंब पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीवरून त्यांनी चक्रवती नदीकाठी आणि बासुरिवाले बाबा दर्ग्याजवळ छापेमारी करून विना अन्नपाणी निर्दयीपणे बांधून ठेवलेल्या २८ गोवंश प्राण्यांना ताब्यात घेऊन गोसेवा संवर्धन ट्रस्टकडे सोपवले आहे. त्याचप्रमाणे, महागाव पोलिसांनी ग्राम बाकोडी येथील कब्रस्तान परिसरात छापा टाकून ७ गोवंश प्राण्यांची सुटका करत शेख रजीक शेख युनुस या आरोपीला अटक केली आहे.

दुसरीकडे, पांढरकवडा पोलिसांनी पाटनबोरी ते मांडवी रोडवर मोठी कारवाई करत तेलंगणा राज्यात कत्तलीसाठी नेले जाणारे २८ गोवंश प्राणी आणि वाहतुकीसाठी वापरले जाणारे ३ लाख रुपयांचे पिकअप वाहन जप्त केले असून, याप्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलीस प्रशासनाच्या या एकाच कालावधीत केलेल्या तिन्ही कारवायांमध्ये जनावरांची किंमत आणि जप्त वाहनासह सुमारे १४ लाख रुपयांचा



मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या कारवाईमुळे गोवंश तस्करी करणाऱ्या टोळ्यांचे मोठे रॅकेट उघडकीस आले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. अशोक थोरात आणि स्थानिक उपविभागीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित पोलीस पथकांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली असून, आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल करून पुढील तपास सुरू आहे.

# जामखेड येथील राष्ट्रीय महामार्ग अतिक्रमण कारवाईत दुजाभाव

**लोकनायक वृत्तसेवा –** विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी विधानभवनात बैठक घेऊन राष्ट्रीय महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमण हटवण्याचे स्पष्ट निर्देश दिल्यानंतर बीड कॉर्नर ते खर्डा चौक या १२० मीटर परिसरातील अतिक्रमण हटवण्यास सुरुवात करण्यात आली.

मात्र, समर्थ हॉस्पिटल ते बीड कॉर्नर या भागातील गटाच्या हद्दी निश्चित झाल्यानुसार तेथील अतिक्रमणांवरही कारवाई होणे अपेक्षित होते. परंतु त्या भागाकडे दुर्लक्ष झाल्याने प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, जामखेडमधील अतिक्रमण हटाव मोहीम फक्त 'धातूरमातूर'



झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

कारवाई होत असेल तर ती सर्वांसाठी समान असावी. नियम गरीबांसाठी वेगळे आणि श्रीमंतांसाठी वेगळे नसावेत. काही धनदांडग्यांना वाचवून सर्वसामान्यांवर अन्याय होत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटवण्याच्या मोहिमेत कोणताही भेदभाव न करता सर्वांवर समान निकष लावावेत, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. प्रशासनाने निवडक कारवाई न करता सर्व अतिक्रमणांवर समान पद्धतीने कारवाई करावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी विधानभवनात बैठक घेऊन राष्ट्रीय महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमण काढण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने बीड कॉर्नर ते खर्डा चौक या १२० मीटर अंतरातील अतिक्रमण हटवण्यास सुरुवात झाली, ही निश्चितच स्वागतार्ह बाब असून यासाठी सभापती प्रा. राम शिंदे यांचे आभार.मात्र वास्तव पाहता समर्थ हॉस्पिटल, बीड रोड ते बीड कॉर्नर या भागातील गटाच्या हद्दी निश्चित झाल्यानुसार तेथील अतिक्रमणांवरही कारवाई होणे क्रमप्राप्त होते.तसं न झाल्याने परत एकदा धनदांडग्यांना वा–चवून सर्वसामान्यांवर अन्याय झाल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.कारवाई होत असेल तर ती सर्वांसाठी समान असावी.नियम गरीबांसाठी वेगळे आणि श्रीमंतांसाठी वेगळे नस–ावेत.

– अवधूत पवार (सामाजिक कार्यकर्ते)

महाराष्ट्र शासन
ग्रामपंचायत कार्यालय मोटेगाव ता.केज जि.बीड
B1- निविदा सुचना क्र.01

अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास योजना सन 2025-26 व ग्रा प अंतर्गत इतर कामे अंतर्गत सरपंच/ग्रामसेवक यांच्याकडुन जि.प. बीड बांधकाम, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण खात्याकडिल नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडुन एकुण 1 कामांकरिता बी-1 नमुण्यातिल निविदा मागविण्यात येत आहेत.

**कामाचे नाव:-**

1) Constrution of Internal CC Raod at Ramai Nagar @Motegaon Tq Kaij Dist Beed –Estimate Cost Rs 600000/-

**नोट-** वरिल निविदेप्रक्रियेची संपुर्ण माहीती ग्रामपंचायत कार्यालय **मोटेगाव** येथे कार्यालयीन वेळेत दि **23-05-2026** ते **31-05-2026** या कालावधीत उपलब्ध आहेत.

स्वाक्षरीत /-
सरपंच ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायतकार्यालय मोटेगाव

महाराष्ट्र शासन
ग्रामपंचायत कार्यालय उंदरी ता.केज जि.बीड
B1- निविदा सुचना क्र.01

15 वा वित्त आयोग करिता सरपंच/ ग्रामपंचायत अधिकारी यांच्याकडुन जि.प. बीड बांधकाम / महाराष्ट्र जिवन प्राधिकरण खात्याकडिल नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याक डुन एकुण 05 कामांकरिता बी-1 नमुण्यातिल निविदा मागविण्यात येत आहेत.

**कामाचे नाव:-**

1) Repair of Existing RO Plant @ Undari Tq Kaij Dist Beed (Estimate Cost- Rs.100000)
2) Paver Block Road /Cement Road Anusuchit Jati Vasti @ Undari Tq Kaij Dist Beed (Estimate Cost-Rs.124021)
3) Construction of Internal Undergraund CC Drain @ Undari Tq Kaij Dist Beed (Estimate Cost- Rs.232000)
4) Construction of Internal Undergraund CC Drain @ Undari Tq Kaij Dist Beed (Estimate Cost-Rs.90000)
5) Construction of Internal Undergraund CC Drain @ Undari Tq Kaij Dist Beed (Estimate Cost-Rs.300000)

**नोट-** वरिल निविदे प्रक्रियेची संपुर्ण माहीती ग्रामपंचायत कार्यालय **उंदरी** येथे कार्यालयीन वेळेत दि. 28-05-2026 ते 03-06-2026 या कालावधीत उपलब्ध आहेत.

स्वाक्षरीत /-
सरपंच ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय उंदरी

# आद. संपादक साहेब जी, दि.२९/०५/२०२६पर्यंत प्रकाशनार्थ जी

## पचनक्रिया सक्षम: शरीरावयव भक्कम

**लोकनायक वृत्तसेवा –** मपचन ही एक रासायनिक प्रक्रिया आहे, ज्यात आपण खाल्लेले अन्न पचनग्रंथींच्या स्रावांच्या संमिश्रणाने सरल रेणूंमध्ये रुपांतरित होते. ही संस्था अन्ननलिका तोंडापासून सुरू होऊन पुढे घसा, जठर, लहान आतडे, मोठे आतडे आणि गुदद्वार अशी बनलेली असते. त्यांत लाळ उत्पादक ग्रंथी, जठर, यकृत, स्वादुपिंड, आणि लहान आतडे यांचा समावेश असतो. स्वतः डॉक्टर नसूनही 'माझे आरोग्य, माझ्याच हाती' या उक्तीप्रमाणे श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींनी खास वाचकांच्या सेवेत सदर संकलित लेख प्रस्तुत करताहेत... संपादक. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आरोग्याची काळजी घेण्याच्या काही महत्त्वाच्या टिप्स– निरोगी आहार व विहार जीवनशैली योग्य असणे आवश्यक. फळे, पालेभाज्या, फायबरयुक्त आहार घेणे गरजेचे. शरीरासाठी पाणी हे अमृतासारखे आहे. दिवसभरात कमीतकमी पाच लिटर पाणी प्यावे. योग्य प्रमाणात पाणी पिल्याने पचनक्रिया सुधारते. रोजच्या जेवणात स्निग्ध पदार्थ, सकस, संतुलित, नियमित, पुरेसा आणि ताजा आहार व्यक्तीला मिळाल्यास आरोग्य सुधारते. आहारावर आरोग्य विषयक स्थिती अवलंबून असते. आहारातील स्वच्छतेमुळे आरोग्याला पोषक स्थिती निर्माण होते. अस्वच्छतेमधून मलेरिया, गॅस्ट्रो आदीसारखे रोग उद्भवतात. वैयक्तिक व सार्वजनिक पातळीवर व्यक्तीने स्वच्छतेसंबंधी काळजी घेतली पाहिजे. ज्यामुळे आरोग्य चांगले राहते. सुयोग्य मनोरंजनामुळे व्यक्तीला शारीरिक, मानसिक स्वास्थ्य लाभते. नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. व्यायामामुळे आरोग्य व्यवस्थित– सुदृढ राहते. व्यायामासोबतच विश्रांतीही तेवढीच महत्त्वाची आहे. आरोग्य आणि विश्रांती या दोन्ही प्रक्रियांचा आंतरिक सहसंबंध आहे.

आरोग्य किंवा तब्बेत हा शब्द असा आहे की, त्याचा अर्थ काय? हे आपणा सगळ्यांना माहित आहे. पण ते नेमक्या शब्दांत सांगता ये नाही. आरोग्य किंवा स्वास्थ्य म्हणजे जेव्हा शरीर आणि मन व्यवस्थित असते म्हणजेच कोणताही रोग, आजार वा वेदना नसतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या दृष्टीने आरोग्य म्हणजे नुसता रोगांचा अभाव नसून ती एक शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक समतोलाची अवस्था आहे. खाल्लेल्या अन्नाचे पचन व्यवस्थित झाले तरच स्वास्थ्य व्यवस्थित राहते. २९ मे रोजी जागतिक पचन स्वास्थ्य दिवस आहे. आपली पचनक्रिया स्वस्थ असेल तर आपले आरोग्य देखील चांगले– स्वस्थ राहते. कारण ९० टक्के आजाराचे मूळ पचनक्रियांशी संलग्न असते. मनुष्याचे शरीर स्वस्थ तेव्हाच असते जेव्हा पचनक्रिया व्यवस्थित असेल. जेव्हा शरीर आणि मन हे दोन्ही व्यवस्थित असतात तरच आपण आपली नेहमीची कामे नीट, व्यवस्थित करू शकतो आरोग्य चांगले राहण्यासाठी आपले शरीरही निरोगी हवे. मनाची उभारीही असावी आणि सामाजिक आरोग्याची स्थिती देखील चांगली असावी. चांगली तब्बेत किंवा आरोग्य म्हणजे नुसता औषधोपचार नाही तर आनंदी व सुखी जीवनही व्यवस्थित असणे महत्त्वाचे आहे. अशी शरीराची आणि मनाची अवस्था असते. भक्कम शरीर म्हणजे ज्यावेळी शरीर संपूर्णपणे काम करण्यास सक्षम असते. आपल्या शरीराचा एखादा अवयव नीट काम करत नसेल तर म्हणजेच डोळ्यांना जर नीट दिसत नसेल, कमी ऐकू येत असेल, खांदे दुखत असतील तरी आपण कामे करतच राहतो. पण ज्याला हा कोणताच त्रास नसतो, तो जास्त आणि चांगले काम करू शकणार नाही का? आरोग्य ही संकल्पना अत्यंत व्यापक अर्थाने उपयोगात आणली जाते. आरोग्य म्हणजे स्थुल मानाने शारीरिक, मानसिक, सामाजिक संतुलनाची स्थिती होय. आरोग्यास असंतुलन निर्माण झाल्यास रोग–व्याधी जडतात. जी व्यक्ती आपली सामाजिक भूमिका सुव्यवस्थित पार पाडण्यास शारीरिक, मानसिक दृष्ट्या सक्षम असते. ती आरोग्यसंपन्न मानली जाते. म्हणून आरोग्य ही संकल्पना अत्यंत महत्वपूर्ण आहे. याविषयावर डॉक्टर म्हणतात की, आपली पचनक्रिया स्वस्थ असेल तर आपले आरोग्य देखील स्वस्थ राहते. कारण बहुसंख्य व्याधींना कारणीभूत पचनक्रियाच असते. पचनक्रिया चांगली राहण्यासाठी निरोगी आहार व विहार जीवनशैली योग्य असणे अत्यावश्यक आहे. व्यक्तीची पचनक्रियाच काम सुरळीतपणे पार पाडत नसेल तर त्यास अपचनाचा आजार जडतात. जसे की, आम्लपित्त, उलटी, जुलाब, जाडेपणा, मधुमेह. त्यासाठी आहार हा पौष्टिक असावा लागतो. निरोगी राहणे हे व्यक्तीच्या सात्विक जीवनशैली आणि पौष्टिक आहार यांवर अवलंबून असते. पचनशक्ती सशक्त राहण्यासाठी फळ, पालेभाज्या आणि फायबरयुक्त आहार घेणे गरजेचे असते. रोजच्या जेवणात जास्त मेदयुक्त पदार्थ खाऊ नयेत. त्यामुळे पचनक्रिया मंदावते. शरीरासाठी पाणी हे अमृतासमान आहे. योग्य प्रमाणात पाणी पिल्याने

लोकनायक

गुरुवार दि.२८ मे २०२६



# अकोल्याचे खंडेलवाल ज्वेलर्सचे ९ वे दालन आता जालन्यात तर बुलढाण्याचे स्थलांतर

## सिनेतारका प्राजक्ता माळी यांची दोन्ही ठिकाणी उपस्थिती

**नऊ दशकांपासून आपल्या पारदर्शी व्यवहारांमुळे सोने-चांदीच्या व्यवसायात संपुर्ण विदर्भात अग्रेसर असलेल्या, रवी-नितीन खंडेलवाल यांचे, खंडेलवाल ज्वेलर्स, विदर्भासोबतच आता मराठवाड्यात प्रवेश करीत आहे. मराठवाड्यातील स्टील हब म्हणुन वेगाने पुढे येत असलेल्या जालना शहरात हे ९ वे दालन प्रारंभ होत असल्याची माहीती संचालक नितीन खंडेलवाल यांनी दिली**

**लोकनायक वृत्तसेवा –**
येत्या ३१ मे रोजी जालना येथील, बडी सडक, आदीत्य कॉम्पलेक्स मध्ये हे भव्य दालन साकार होत असुन, सुप्रसिद्ध सिनेतारीका, हास्यजत्रा फेम, प्राजक्ता माळी यांची प्रमुख उप-स्थिती या शुभारंभ प्रसंगी राहणार आहे. तसेच जेम्स अ‍ॅन्ड ज्वेलरी डोमेस्टीक कौन्सीलचे, राष्ट्रीय उपाध्यक्ष, हैद्राबाद येथील अविनाश गुप्ता हे याप्रसंगी मुख्य अतिथी म्हणुन उपस्थित राहणार आहेत.



सहाव्या पिढीतील हर्षल-नितीन, प्रतीक-रवी आणि सौ. शौर्या आणि सौ. रिषीका याही व्यवसायात नव्याने पदार्पण करुन हातभार लावत असल्यामुळे कार्यक्षेत्र वाढविण्यात येत असल्याचेही खंडेलवाल यांनी सांगितले.



तसेच दि. १ जुन रोजी बुलढाणा येथील शोरुमचेही स्थानांतरण होत असून बुलढाणा येथील घग-५ ग्राहकांच्या अधिक उत्तम सेवेसाठी, अधिक प्रशस्त व आकर्षक स्वरुपात, सराफा लाईन मधील, जनता चौकात स्थानांतरीत करण्यात येत आहे. याठिकाणीही दि. १ जुन रोजी प्राजक्ता माळी यांची उपस्थिती राहणार असून, बुलढाणा जिल्ह्यातील बुलढाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक मुख्य अतिथी म्हणुन उपस्थित राहणार आहेत.



खंडेलवालांच्या परंपरेला साजेसे सर्व प्रकारातील दागिने, सोने, चांदी, डायमंड ज्वेलरी, प्लॅटीनम या शिवाय सर्व नाविन्यपुर्ण आणि वैविध्यपुर्ण ज्वेलरी या दोन्ही दालनात भरगच्च स्वरुपात उपलब्ध राहणार असून, आजच्या पिढीला आवडतील असे कमी वजनातील दागिने, ब्रेसलेट्स, अंगठ्या, कानातले, अगणित प्रकारात उपलब्ध आहेत. जालना आणि बुलढाणा या दोन्ही ठिकाणी आमच्या मान्यवर ग्राहकांनी भेट देऊन आमच्या दालनातील ज्वे-लरी, पारंपारीक दागिने, डायमंड ज्वेलरी, एकदा डोळ्याखालुन घालावी अशी नम्र विनंतीही या निमित्ताने नितीन खंडेलवाल यांनी खंडेलवाल ज्वेलर्सतर्फे केली आहे.

# आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

## आ.धस अनब नाम फाउंडेशनच्या माध्यमातून कानडीच्या पुरग्रस्त बंधाऱ्याला नवसंजीवनी!

**लोकनायक वृत्तसेवा –**
तालुक्यातील कानडी परिसरात मागील वर्षी झालेल्या मुसळधार पावसामुळे व आलेल्या भीषण पुरामुळे येथील बंधाऱ्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. पुराच्या प्रचंड प्रवाहामुळे बंधाऱ्याचे मूळ पात्र बदलले गेले होते. तसेच पाण्याच्या वेगामुळे बंधाऱ्याच्या साईडने मोठ्या प्रमाणात सुपीक शेती जमीन वाहून गेली होती. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते. अनेक शेतकऱ्यांच्या शेतीचे अस्तित्व धोक्यात आले होते, तर भविष्यात पुन्हा पूर आल्यास आणखी मोठे नुकसान होण्याची भीती ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात होती.

या गंभीर समस्येची दखल घेत आष्टी मतदारसंघाचे लोकनेते आ. सुरेश धस यांनी तातडीने प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला. ग्रामस्थांच्या अडचणी समजून घेत त्यांनी या कामासाठी सातत्याने प्रयत्न करत नाम फाउंडेशनच्या



माध्यमातून बंधारा दुरुस्ती तसेच वाहून गेलेली जमीन पुन्हा बुजवण्याच्या कामाला मंजुरी मिळवून दिली. त्यांच्या प्रयत्नांमुळे अखेर या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने कानडी व परिसरातील ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या महत्त्वपूर्ण कामाचा शुभारंभ आज उत्साहपूर्ण वातावरणात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. बंधारा दुरुस्ती व वाहून गेलेली जमीन बुजवण्याच्या कामाचे उद्घाटन आष्टी तालुका कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान शेठ तांबोळी, मार्केट कमिटी संचालक संजय ढोबळे, सरपंच शेळके, फत्तेवडगावचे सरपंच नाना काळे तसेच गणप्रमुख अन्सार शेख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बेलगावचे माजी सरपंच दीपक भांबे, हरिभाऊ बाबर, आष्टी तालुका अध्यक्ष राजू शिंदे, माजी उपसरपंच दत्ताभाऊ खिळे, भारत खिळे, ग्रामपंचायत सदस्य सुनील शिंदे, आजीनाथ मेजर, लाला खिळे, शांतीलाल खिळे, अंकुश खिळे, **पान २ वर**

# ओंकार शुगर्सने फिरवली पाठ; ऊस बिल प्रश्नी शेतकऱ्यांची दिशाभूल

**लोकनायक वृत्तसेवा –**
परळी तालुक्यातील ऊस उत्प-ादक शेतकऱ्यांचा मुख्य आर्थिक स्रोत असलेल्या ओंकार शुगर युनिट क्र ८ पांगरीने मार्च अखेरीस गाळप केलेल्या ऊसाची देयक घोषित दरानुसार अदा करावीत या मागणीला घेत ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती लढा देत असून ओंकार कडून वारंवार आश्वासणाची बोळवण केली जात असल्याने समितीने या महिन्याखेर जाहीर केलेल्या दरानुसार पूर्ण ऊस देयक शेतकऱ्यांच्या ख्याती वर्ग करण्यात यावी अशी मागणी निवेदनात द्वारे केली. ऊस देयक अदा न झाल्यास दि १ जून पासून साखर कारखान्यासमोर बेमुदत सत्याग्रह आंदोलन करण्याचा इशारा दिला.



ओंकार शुगर्स कडून मार्च अखेरीस गाळप केलेल्या ऊस देयक प्रश्नी ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती वेळोवेळी निवेदने, आंदोलने करत आलेली असून दि ८ मे रोजी केलेल्या बेमुदत सत्याग्रह आंदोलन प्रसंगी कारखाना प्रशासनाने दि २५ मे पर्यन्त घोषित केलेल्या २९५० रु प्रमाणे सर्व शेतकऱ्यांना ऊस देयक अदा करण्यात येतील असे लेखी अभिवचन देत १८०० रु वर्ग देखील केली.एकाच गळीत हंगामात सुरुवातीला २९५० दर पश्चात १८०० रुपये देयक दिली. मात्र मे महिना संपत आला तरी कारखाना प्रशासनाकडून घोषित केलेल्या गाळप केलेल्या ऊसाबाबत **पान २ वर**

# सौर ऊर्जा योजनेत बीड राज्यात अव्वल; गेवराई तालुका प्रथम

**लोकनायक वृत्तसेवा –**
महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वकांक्षी सौर ऊर्जा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून बीड जिल्हाने संपूर्ण राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच बीड जिल्ह्यात गेवराई तालुका यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यामुळे शेतकरी ग्राहका मध्ये आनंदाचे वातावरण आहे. या मध्ये बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे आणि योजनेचे गेवराईचे समन्वयक श्याम मोरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे यश प्राप्त झाले आहे. बीड जिल्ह्यातून ५५ ६१८ अर्ज दाखल झाले असून सर्वच अर्ज निकाली निघाले आहेत. गेवराई तालुक्यातील चालू महिन्यात १०३ अर्ज राहिले आहेत. त्यामुळे गेवराई तालुका बीड जिल्हात प्रथम आला आहे.



जिल्ह्यात चालू महिन्यात सध्या फक्त ५०३ अर्ज शिल्लक आहेत. गेल्या महिन्यात ३२४ ०५ सौर ऊर्जा पंप बसविण्यात आले आहेत. या यशाबद्दल संपूर्ण जिल्ह्यातून कौतुक होत आहे. बीड जिल्ह्याला सौर ऊर्जा लाभ मिळण्यासाठी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन, मुख्य अभियंता, महासंचालक महाऊर्जा पुणे, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता गेवराई यांच्याकडे वारंवार दिनांक ९ /१/२०२४ पासून जिल्ह्याला सौर ऊर्जा योजनेचा जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी अनिल बोर्डे यांनी विविध प्रशासकीय पातळीवर तीव्र संघर्ष केला आहे. केवळ पत्रव्यवहार न थांबता त्यांनी प्रत्यक्ष भेटी घेऊन वेळोवेळी अधिकाऱ्यासोबत सविस्तर चर्चा केल्या व सौर ऊर्जाचा पूर्ण अभ्यास केला. आणि जिल्ह्यातील शेतकरी ग्राहकाची गरज महाराष्ट्र शासन व प्रशासनासमोर वेळोवेळी मांडली. प्रशासन विषय मार्गी लावण्यात कमी पडत असल्यामुळे बोर्डे यांनी थेट मुख्यमंत्री राज्याचे ऊर्जामंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. बीड जिल्हाला उत्पन्न स्रोत कमी **पान २ वर**

# त्यागमूर्ती माता रमाईना स्मृतिदिनानिमित्त लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात अभिवादन

**लोकनायक वृत्तसेवा –**
बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आज बुधवार दि.२७ रोजी त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांनी माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.कार्यक्रमास सरपंच बाल-ासाहेब जाधव, भिम टायगर ग्रुपचे बीड जिल्हाध्यक्ष रविबापू निमळ, ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात, रमेश गायकवाड, महादेव कुदळे, माजी सरपंच बाळासाहेब मुळे, बाळकृष्ण थोरात, अँड. गणेश वाणी, सुरेश निमळ, गणपत



तागड, दादासाहेब गायकवाड, मोहन कोटुळे, हरि पाटील, संजय पावले आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना भिम टायगर ग्रुपचे जिल्हाध्यक्ष रविबापू निमळ यांनी **पान २ वर**

# आष्टी चित्रदर्शनचे उपसंपादक यशवंत हंबर्डे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**लोकनायक वृत्तसेवा –**
आष्टी चित्रदर्शनचे उपसंपादक तथा सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेले यशवंत हंबर्डे यांचा वाढदिवस आष्टी येथे मोठ्या उत्साहात आणि आनंदी वाता-वरणात साजरा करण्यात आला. विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांना शुभेच्छांचा वर्षाव केला. या प्रसंगी पत्रकार किरण जावळे, सामाजिक कार्यकर्ते संपत सायकड तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे म्हणून ओळखले जाणारे तथा पत्रकार समीर शेख याची उप-



स्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी यशवंत हंबर्डे यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील कार्याचे कौतुक करत त्यांच्या सामाजिक बांधिलकीचेही गौरवपूर्ण शब्दांत वर्णन केले. कार्यक्रमादरम्यान केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. मित्रपरिवार आणि सहकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. ङ्गपत्रकारिता **पान २ वर**

## सुचना

दैनिक बीडचा **लोकनायक** वृत्त पत्रातुन प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी यासंबधी व्यवहार करावा. जाहीरातीत आपल्या उत्पादन व सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात. त्यांची लोकनायक वृत्तपत्र समुह कोणतीही हामी घेत नसुन केलेल्या दाव्याची पुर्तता. जाहिरातदाराकडुन न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दूल लोकनायक वृत्तपत्र समुह जवाबदार राहणार नाही. याची कृपया सन्माननिय वाचकांनी नोंद घ्यावी.










This newspaper printed by owner printer publisher editor Bharat Devdas Gaikwad chief editors Abhijeet Gaikwad at indradhanush printers and publishers near post office paid bid Kharagpur Beed 431122 Maharashtra and published at the office of Dainik loknayak near Kharagpura beed 431122 Maharashtra

हे पत्रक मालक मुद्रक प्रकाशक संपादक भारत देविदास गायकवाड कार्यकारी संपादक अभिजीत गायकवाड यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अँड पब्लिशर्स पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले निवासी संपादिका नायरा राज मुळे पी आर बी कायद्यानुसार सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत मोबाईल नंबर ९८ ५० १६ ५० ८२ / ९४ २० ४०६०१९ email- dainikloknayak@gmail.com